# प्रतापगड येथे शिवप्रताप दिन उत्साहात साजरा

## छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवर्षाव

**सातारा : हॅलो प्रभात**

ढोल ताशांचा निरंतर गजर, छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष, रोमांच उभा करणारा तुताऱ्या, झांजांचा आवाज आणि हेलिकॉप्टरमधुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यावर पुष्पवृष्टी, शिवकालीन धाडशी खेळांचे अंगावर शहारे आणणारे प्रात्यक्षिक अशा अलोट उत्साहात आज किल्ले प्रतापगडावर शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात आई भवानी मातेची महापूजा करण्यात आली. पुजारी



शंकर गुरुजी यांनी पौरोहित्य केले.भवानी मातेच्या मंदिरासमोर ध्वजस्तंभाचे मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करुन शिवशाहीचे प्रतीक असणाऱ्या भगव्या ध्वजाचे रोहण करण्यात आले. त्यावेळी ढोल, तुताऱ्या, लेझीम यांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला.

आई भवानीची आरतीनंतर मानाच्या पालखीची मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची पालखीची वाजत गाजत मिरवणूक सुरु झाली. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्यासह सर्व उपस्थित मान्यवरांनी पालखी घेऊन मिरवणूक मार्गस्थ केली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जावली, दरे, वाडा कुंभरोशीच्या विद्यार्थी, विद्यार्थीनींचे लेझीम- तुताऱ्या, काठीवर चालणारी मुले, आई भवानी मातेचा व शिवरायांचा जयजयकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घोषणांनी मिरवणूक मार्ग दुमदूमून गेला.

छावा युवा मंचचे अध्यक्ष उदय यादव यांनी लहान मोठ्या विद्यार्थ्यांसह लाठी काठी, तलवारबाजी आदी ऐतिहासिक खेळांची डोळ्यांचे पारणे फेडणारी प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी वाईचे प्रांताधिकारी डॉ.योगेश खरमाटे, महाबळेश्वर तहसिलदार सचिन मस्के, वाडा कुंभरोशीच्या सरपंच ज्योती सावंत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी तसेच शिवप्रेमी नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संगीत नाटक ‘राजगायक’चे बहारदार सादरीकरण

## कला गंधर्व प्रतिष्ठानचे आयोजन

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

येथील कला गंधर्व साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने सातव्या कला केंद्र महोत्सवात प्रतिष्ठानच्या कलाकारांनी सादर केलेल्या दोन अंकी संगीत नाटक ‘राज गायक’ या संगीत नाटकाचा पहिलाच प्रयोग बहारदारपणे सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. येथील हॉटेल मंगलम सभागृहात या कलागंधर्व महोत्सवाची ‘राजगयक’ संगीत नाटकाने सांगता झाली. या संगीत नाटकाचे लेखन गुरुप्रसाद रिसबूड यांनी केले होते. याचे दिग्दर्शन मिलिंद ठाणेकर यांनी केले.

संगीत दिग्दर्शन अवधूत नारायण पुजारी यांनी केले. या संगीत नाटकात वेगवेगळ्या रागावर आधारित २७ नाट्यगीते सादर करण्यात आली. या नाट्य गीतांचे लेखन कवी डॉ. बाळकृष्ण जमदग्नी, डॉ.दिनेश फडणीस,गुरु रिसबूड, दत्तात्रय आलासकर, अवधूत पुजारी यांनी केले. नैपत्य नाट्य शुभांगी जयसिंगपूर यांनी केले. संगीत साथ संगत बाळासाहेब आलासकर, श्रीरंग आलासकर, धनंजय गाडगीळ यांची होती.

यासाठी विशेष सहकार्य अपूर्वा पुजारी वरुण पुजारी यांचे मिळाले. या दोन अंकी संगीत नाटकांमध्ये बाळकृष्ण चोपदार, रोहित पुजारी, सौ.मंजिरी कुलकर्णी, कु. जय विभुते, राम आकोळकर, दत्तात्रेय पुजारी, कैलास पुजारी,गुरु रिसबूड,अनंत पुजारी, श्रीरंग पुजारी, सौ. पूर्णा रिसबूड, सोहम मोरबाळे कलाकारांनी उत्कृष्ट अभिनव गायकी सादर केली. कडच्या या इंटरनेटच्या युगात हे सर्व बंद झाले होते. मात्र कला गंधर्व प्रतिष्ठानच्या सदस्यांनी पुन्हा एकदा संगीत नाटक सादर करून जुन्या स्मृतींना उजाळा दिला आहे.

# डॉ. धिवार यांना महात्मा ज्योतीबा फुले पुरस्कार जाहीर

**पुणे : हॅलो प्रभात**

येथील माऊली प्रतिष्ठान संचलित, श्रीमती कलावती बधे कला व वाणिज्य महाविद्यालय, कोंढवा येथील प्रभारी प्राचार्य डॉ. प्रमोद धिवार यांना नवी दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमी वतीने दिला जाणारा महात्मा ज्योतीबा फुले राष्ट्रीय पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. संशोधन व सामाजिक कार्य या योगदानाबद्दल दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम असे आहे.



१२ डिसेंबर रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या विशेष कार्यक्रमात डॉ. प्रमोद धिवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे भारतीय दलित साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. सुमन शंकर यांनी जाहीर निवेदनात सांगितले आहे.

डॉ. प्रमोद धिवार यांनी जोतीराव फुले विषयक चरित्रग्रथांचा अभ्यास या विषयावर संशोधनापर प्रबंध लिहिला आहे. तसेच त्यांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध संशोधनावर शोधनिबंध सादर केले आहेत. या पुरस्काराबद्दल माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक संदीप बधे, अध्यक्षा ड.सौ.प्रिती संदीप बधे, सचिव डॉ.किरण गोरे यांनी अभिनंदन केले. तसेच परिसरातून सर्व स्तरातील मान्यवरांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# लेखन स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा : प्रा.संजय ठिगळे

**सांगली : हॅलो प्रभात**

संविधानाने आम्हाला अभिव्यक्ति आणि लेखनाचे स्वातंत्र्य दिले. विचारांची मांडणी करण्याचा अधिकार दिला.त्यामुळेच लोकशाही अधिक भक्कम झाली आहे. लेखनाच्या माध्यमातून अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्यांवर परखडपणे लिहणे हीच खरी लेखकाची जबाबदारी असते असे मत जेष्ठ लेखक प्रा.संजय ठिगळे यांनी व्यक्त केले. केले.

सांगली येथील भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयामध्ये संविधान दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या पत्रकारितेच्या



माजी विद्यार्थ्यानी प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. प्रारंभी उपस्थितांचे स्वागत राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपाली कांबळे यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या पत्रकारिता पदवीचे माजी विद्यार्थी व सांगली जिल्ह्याचे माजी मुद्रांक अधिकारी धनंजय जोशी म्हणाले की, आम्ही डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहोत याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. श्रीकृष्ण मोहिते म्हणाले की, भारती विद्यापीठाच्या माध्यमातून डॉ. पतंगराव कदम यांनी शिक्षणाची गंगा खेडोपाडी पोहचवली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेकानंद रणखांबे आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की, महाविद्यालयाचे आजी माजी विद्यार्थी आणि प्राध्यापक महाविद्यालाच्या नावलौकिकात भर घालत असतात.

माजी विद्यार्थी जेंव्हा ग्रंथ भेट देतात तेंव्हा त्यातून त्यांचा आधुनिक दृष्टिकोण लक्षात येतो. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अमित सुपले, कनिष्ट विभागाचे प्रमुख प्रा. ए. एल. जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपाली कांबळे इ. मान्यवर उपस्थित होते.

# शिवसेना उबाठा पक्षाची भव्य ‘मशाल रॅली’

**कुर्डुवाडी : अंकुश आतकर**

कुर्डुवाडी नगरपरिषदेच्या प्रचार शिगेला पोहोचला असून प्रत्येक पक्ष व आघाडी यांनी शहरात प्रचाराची धामधूम सुरु केली आहे.यामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदाच्या उमेद वारांच्या प्रचारार्थ हलगीच्या निनादत शहरातून ‘मशाल रॅली’ काढण्यात आली.

ही रॅली वागळे हॉस्पिटल माढा रोड येथे शुभारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून



कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ गावदेवी मंदिरात समाप्ती करण्यात आली. सदर रॅलीमध्ये पेटत्या मशाली घेऊन युवक वर्ग, महिला बहू संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीत शेकडो महिला व पुरुष पेटलेल्या मशाली घेऊन यात सहभागी झाले होते. त्यामुळे रॅली दरम्यान शहरात अबाल वृद्धांनी गर्दी केली होती. शिवसेना उबाठा गटाच्या नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार जयश्री भिसे या निवडणूक रिंगणात असून, या पक्षाने सर्व २० जागांवर उमेदवार उभे केले आहेत.

या रॅलीमध्ये शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, माणिक श्रीरामे, साहिल भिसे, स्वप्नील गवळी, साक्षी भिसे, कुमार गव्हाणे, राजेंद्र वाल्मिकी यांच्यासह उमेदवार, पक्ष पदाधिकारी सहभागी झाले होते.

# टेंभुर्णी येथे संविधान दिनानिमित्त रक्तदान शिबिर



## नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**टेंभुर्णी : हॅलो प्रभात**

टेंभुर्णी येथे संविधान दिना निमित्त तसेच २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय सैन्य दल व महाराष्ट्र पोलीस दलातील वीरांना अभिवादन करण्याच्या अर्थपूर्ण उपक्रमांतर्गत टेंभुर्णी पोलीस ठाणे व रेव्हनील ब्लड बँक, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने आज टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सहायक पोलीस निरीक्षक श्री. गणेश चौधरी, पोलीस उपनिरीक्षक अजित मोरे, पुरुषोत्तम धापटे, स्वाती सुरवसे यांच्यासह पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

देशरक्षणासाठी हौतात्म्य स्वीकारलेल्या वीरांना आदरांजली अर्पण करण्याच्या भावनेतून आयोजित केलेल्या या उपक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक अशा १०१ रक्तदात्यांनी या शिबिरात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपली.



# संदीप मतेंनी ३ हजार महिलांना घडवले महाकाल दर्शन

**पुणे : प्रकाश यादव**

खडकवासला शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षाच्या वतीने आयोजित उज्जैन महाकाल यात्रेच्या पहिल्या टप्प्यातील ३ हजार माता-भगिनींना ओळखपत्र वाटप कार्यक्रम खडकवासला येथे उत्साहात पार पडला. या प्रसंगी पुणे शहर संपर्कप्रमुख आणि आमदार सचिन अहिर यांनी उपस्थित रहात खडकवासल्याच्या श्रावण बाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युवा नेते संदीप मते पाटील यांच्या उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी अहिर म्हणाले, संदीप मते यांनी खडकवासला परिसरात लोकाभिमुख उपक्रमांद्वारे प्रभावी नेतृत्व दाखवले आहे. अशा समर्पित कार्यकर्त्याला जनतेचा मोठा आशीर्वाद मिळायला हवा. त्यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहा. आपल्या आशीर्वादाने खडकवासल्याला एक परिश्रमी, जनतेसाठी झटणारा युवा नगरसेवक पाहायला मिळेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात बोलताना संदीप मते म्हणाले, महाकाल यात्रा हा माझा जनसेवेचा संकल्प आहे. पहिल्या टप्प्यात ३ हजार भगिनींना ओळखपत्र देण्यात आले असून, एकूण १० हजार महिलांना उज्जैन दर्शन घडविण्याचा मानस आहे.

ते पुढे म्हणाले, आजवर मी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्वावर काम केले आहे. यापुढेही प्रभागातील जनतेसाठी कटिबद्ध राहणार आहे. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

# कपिल घाडगे यांची अध्यक्षपदी निवड

**गांधीनगर : हॅलो प्रभात**

संविधान दिनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या (अनु. जाती विभाग) करवीर (पूर्व) तालुका अध्यक्षपदी कपिल घाटगे यांची नियुक्ती करण्यात आली. आ. सतेज पाटील यांच्या शुभहस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.



या प्रसंगी अरविंद कुरणे महाराष्ट्र राज्य सचिव, प्रा.वसंतराव चांदुरकर कोल्हापूर जिल्हाध्यक्ष अनु.जाती विभाग, सुजितकुमार माळगे जिल्हा काँग्रेस कमिटी सदस्य भारतीताई पवार व जिल्ह्यातून काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मस्करवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची गैरसोय

**सातारा : सूर्यकांत पाटणकर**

ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य सोयी सुविधा मिळण्यासाठी गाव तेथे आरोग्य केंद्र शासनाने उभारली आहेत मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे सध्या ग्रामीण भागातील रुग्णांना वैद्यकीय सुविधा मिळत नसल्याने त्यांना खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत आहे मस्करवाडी ता. कराड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्रात नियमित हजर नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली करावी अशी मागणी गावातील सरपंच यांनी केली आहे.

याबाबत दिलेल्या तक्रारीनुसार



मस्करवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती मात्र एक अधिकारी उंब्रज येथे बदली करून गेल्याने एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यांवर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा भार होता मात्र संबंधित वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्रात हजर नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे परिणामी रुग्णांना तारळे सातारा किंवा उंब्रज या ठिकाणी वैद्यकीय सुविधा घेण्यासाठी जावे लागत आहे परिणामी रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मनमानीला चाप बसणार का असा प्रश्न यानिमित्ताने विचारला जात आहे.

मस्करवाडी प्राथमिक प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत दुसाळे चव्हाणवाडी शाळा दुसाळे बांधवाट पाबळवाडी बोरगेवाडी विरेवाडी चोरजवाडी साखरवाडी ही गावे येत असल्याने या गावांमध्ये सध्या रुग्णांना कोणतेही प्राथमिक उपचार मिळत नाहीत सध्या मस्करवाडी या प्राथमिक आरोग्य केंद्रात एकच वैद्यकीय अधिकारी उपस्थित असल्याने व तेही अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र दररोज उपस्थित नसल्याने रुग्णांची हेळसांड होत आहे परिणामी रुग्णांना खाजगी दवाखान्याचे किंवा तारळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा आधार घ्यावा लागत आहे त्यामुळे संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली करावी व मस्करवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक पुरुष वैद्यकीय अधिकारी नेमावा अशी मागणी मस्करवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी केली आहे.

दरम्यान गुरुवारी तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी मस्करवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात भेट दिली असता संबंधित वैद्यकीय अधिकारी हजर होते मात्र इतर वेळी ते हजर राहत नसून रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे त्यामुळे या संबंधित अधिकाऱ्यांची बदली करावी अशी मागणी ग्रामस्थांनी व सरपंचांनी केली आहे.